सन २०१७ च्या खरीप हंगामातील मध्यम स्वरूपाच्या दुष्काळाच्या अनुषंगाने कृषी विषयक मदतीसाठी निविष्ठा अनुदान उपलब्ध करून देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक :- संकीर्ण- २०१७/ प्र.क्र.१७३/म-७
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- ०८ फेब्रुवारी, २०१८

संदर्भः- १) महसुल व वन विभाग, शासन निर्णय, समक्रमांक, दिनांक ७ ऑक्टोबर, २०१७
२) महसुल व वन विभाग, शासन निर्णय, समक्रमांक, दिनांक ३० ऑक्टोबर, २०१७
३) जिल्हाधिकारी, गोंदिया यांचे दिनांक ८/१/२०१८ रोजीचे पत्र.

प्रस्तावना :-

दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ नुसार राज्यातील दुष्काळी परिस्थितीचे मुल्यांकन करून सन २०१७ च्या खरीप हंगामात संदर्भाधीन शासन निर्णय क्र. २ नुसार राज्यातील गोंदिया जिल्ह्यातील गोंदिया, तिरोडा व गोरेगांव या तीन तालुक्यांमध्ये मध्यम स्वरूपाचा दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. त्यानुषंगाने शेतक-यांच्या झालेल्या नुकसानीची भरपाई करण्यासाठी नुकसानग्रस्त शेतक-यांना कृषी विषयक मदतीसाठी निविष्ठा अनुदान उपलब्ध करून देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

१. सन २०१७ च्या खरीप हंगामात राज्यातील गोंदिया, तिरोडा व गोरेगांव या ३ तालुक्यामध्ये मध्यम स्वरूपाचा दुष्काळ घोषित करण्यात आला आहे. त्यानुसार सदर तीन तालुक्यातील १,१०,०९१ बाधित शेतक-यांना कृषि विषयक मदत वाटप करण्यासाठी निविष्ठा अनुदानाकरीता (input subsidy) एकूण रूपये २७२०.७४ लक्ष निधी उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर मदतीचे वाटप २०१७ मधील खरीप हंगामातील ७/१२ वरील पीकाच्या नोंदीच्या आधारे करण्यात यावे.

३. २०१७ खरीप हंगामातील पिकांचे संयुक्त पंचनाम्याच्या आधारे ३३ टक्के नुकसान ठरविण्यात यावे व शासन निर्णय, दिनांक १३.५.२०१५ मधील परिशिष्टातील परिच्छेद ५ (B) नुसार विहित केलेल्या अटी व शर्ती विचारात घेवून विहित दराने २ हेक्टरच्या मर्यादेत मदतीचे वाटप करण्यात यावे.

४. बहुवार्षिक फळपिके व बागायती पिके यांचे ३३ टक्के पेक्षा जास्त नुकसान झाल्याची शहानिशा शेतीनिहाय पंचनामे करुन करण्यात येईल.

५. बहुवार्षिक फळपिके व बागायत पिकांचे नुकसान ठरविण्याचा निकष ७/१२ मधील नोंद हा असेल. नुकसानीची तिव्रता ठरविण्यासाठी पंचनामा हा निकष असेल. बहुवार्षिक फळपिके व बागायत शेतीचे नुकसान ठरविण्यासाठी त्याची नोंद ७/१२ मध्ये आवश्यक आहे. तसेच याचे सोबत या पिकांचे नुकसानीबाबतचे पंचनामे केले असणे आवश्यक राहील.

६. सन २०१७ च्या खरीप हंगामातील पीक पाहणी मधील पिकाच्या ७/१२ मधील उता-यातील नोंदीबाबत कोणताही आक्षेप उद्भवल्यास त्याचे निराकरण जमीन महसूल संहितेमधील तरतुदीनुसार करण्यात येईल.

७. सदरहु आदेश हे प्रशासकीय मान्यतेचे असून निधी वितरीत करण्याबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१८०२०८१४५६४६४०१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Subhash Hanmant Umaranikar

Digitally signed by Subhash Hanmant Umaranikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d5ea2bb9565eeb9b02d583f130371941a03fc5d98df65d3daafe66960a165024, serialNumber=596a24adfcfcd3edb4245812c0eaccecdf4de3ec6a308b42a682a980bca4db38, cn=Subhash Hanmant Umaranikar
Date: 2018.02.08 15:03:33 +05'30'

(सुभाष उमराणीकर)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव
२. मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व)
३. सर्व लोकसभा सदस्य/राज्यसभा सदस्य (महाराष्ट्रातील)
४. सर्व विधानसभा सदस्य/विधान परिषद सदस्य
५. मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव
६. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
७. प्रधान सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग
८. अपर मुख्य सचिव (मदत व पुनर्वसन)
९. प्रधान सचिव (महसूल), महसुल व वन विभाग
१०.आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
११.महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र , मुंबई/नागपूर

१२.महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
१३.सर्व विभागीय आयुक्त
१४.सर्व विभागीय कृषि सह संचालक
१५.जिल्हाधिकारी, गोंदिया
१६.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया
१७.जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, गोंदिया
१८. जिल्हा कोषागार अधिकारी, गोंदिया
१९.वित्त विभाग, व्यय-९/अर्थसंकल्प कक्ष/अर्थोपाय कक्ष), मंत्रालय, मुंबई
२०.महसुल व वन विभाग (म-११/म-३), मंत्रालय, मुंबई-३२
२१. सर्व सहसचिव/उपसचिव कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२२.निवड नस्ती म-७ कार्यासन.